मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पवना नदी प्रदूषणाला अधिकारी जबाबदार

## खासदार श्रीरंग बारणे यांनी दिला 'हा' इशारा

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** मागील काही दिवसात चारवेळा पवना नदी फेसाळली आहे. नदीपात्रात थेट ड्रेनेज, रसायनमिश्रित पाणी सोडले जाते. रावेत येथील अशुद्ध बंधा-यापर्यंत दुषित पाणी गेले आहे. शहरवासीयांना दुषित पाणीपुरवठा केला जात आहे. पवनामाईच्या दुर्देशला महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी हे जबाबदार आहेत. शासनाने त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी, अन्यथा न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिला आहे. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना पत्र लिहून संजय कुलकर्णी यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची (एमपीसीबी) पत्र दिले आहे. खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, शहरातून वाहणाऱ्या पवना नदीचे पात्र २४ किलो मीटर आहे. किवळेपासून दापोडीपर्यंत पवना नदीचे प्रदूषण वाढले आहे. नदीलगतच्या भागात किवळे, पुनावळे, रावेत, ताथवडे, वाल्हेकरवाडी, थेरगाव, चिंचवडगाव, काळेवाडी, पिंपरी, दापोडी, पिंपळेगुरव, सांगवी, कासारवाडी व दापोडीपर्यंत पाण्याचे प्रदूषण वाढल्याचे दिसून येते. पवना नदी सातत्याने फेसाळत आहे. नदीतील पाण्यावर फेस तरंगतो. नदी प्रदूषित झाली आहे. यंदाच्या पावसाळ्यात चारवेळा नदी फेसाळली. दोनदिवसांपूर्वी थेरगावातील



केजुदेवी बंधारा ते चिंचवडगावातील श्री मोरया गोसावी घाट या दरम्यान पवना नदी मोठ्या प्रमाणात फेसाळली. मासे मृत पावले. सांडपाणी, रसायनमिश्रित पाणी नदीपात्रात सोडल्याने सातत्याने नदी फेसाळत आहे. पवनामाईची दुरावस्था झाली आहे. नदीपत्रातील पाणी अशुद्ध झाले आहे. दुर्गंधी मोठ्या प्रमाणे होत असल्यामुळे नैसर्गिक जीवितहानी होत आहे. बंधाऱ्यातील पाणी दुषीत झाल्याने मासे व इतर जलचर प्राणी मृत पावले आहेत. नदीपात्रातील पाणी अशुद्ध होत असल्याकारणाने शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. पवना नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. नदी सुधारसाठी मी अनेक दिवसांपासून प्रशासनाकडे

> **संजय कुलकर्णी हे स्वत:ची जहागिरी, मनमानी पद्धतीने काम करत आहेत. ते निष्क्रिय अधिकारी असून पवना नदीच्या प्रदूषणाला कुलकर्णी जबाबदार आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश आयुक्तांना देण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.**
> **– श्रीरंग बारणे, खासदार**

पाठपुरावा करत आहे. अनेक पर्यावरणप्रेमी संघटना त्याविरोधात आवाज उठवत आहेत. परंतु, प्रशासन नदीचा प्रश्न गांभीर्याने घेत नाही. महापालिकेच्या दुर्लक्षामुळे घाण पाणी रावेत बंधा-याच्या वर गेले आहे. ज्या पाण्यामध्ये जीव राहत नाहीत, ते पाणी धोक्याचे आहे, असेही खासदार बारणे म्हणाले. पवना नदीच्या दुर्देशेला पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी हे पूर्णपणे जबाबदार आहेत. सांडपाणी, रसायनमिश्रित पाणी थेट नदीपात्रात सोडले जाते. तरीही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) मालक आणि कुलकर्णी यांचे आर्थिक लागेबांधे आहेत. त्यामुळे शासनाने तत्काळ कुलकर्णी यांच्यावर कारवाई करावी. यासाठी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठविले आहे. शासनाने कारवाई न केल्यास पवना नदीच्या प्रदूषणाला कारणीभूत असलेल्या कुलकर्णी यांच्याविरोधात याचिका दाखल करणार असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

# विविध मागण्यांसाठी एक्साइड इंडस्ट्रीजमधील कामगार संपावर

## व्यवस्थापनाने सुडबुद्धीने आजपर्यंत एकूण ३० कामगारांना कामावरून केले बडतर्फ

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पूर्वीच्या युनियनने कामगारांकडे दुर्लक्ष केले होते म्हणून तेथील कामगारांनी युनियन बदलली. संघटना स्थापन झाल्यापासून कंपनी व्यवस्थापनाने सुडबुद्धीने ३० कामगारांवर केलेल्या विविध कारवाया मागे घ्याव्यात, त्यांना पुन्हा कामावर रुजू करुन घ्यावे, व्यवस्थापनाने महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघ या युनियला स्वीकारावे अशा विविध मागण्यांसाठी एक्साइड इंडस्ट्रीजमधील कामगार बेमुदत संपावर गेले




आहेत. कंपनी व्यवस्थापनाने सुडबुद्धीने आजपर्यंत एकूण ३० कामगारांना कामावरून बडतर्फ केले आहे. कामगारांनी एप्रिल-मे महिन्यात बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला होता. व्यवस्थापन आणि कामगारांमध्ये समेट घडविण्यासाठी कामगार आयुक्तांच्या प्रयत्नांतून कामगार मंत्र्यासोबत कंपनी व्यवस्थापनासोबत बैठक झाली होती. गेल्या पाच महिन्यात संघटनेने व्यवस्थापनाला सहकार्य केले. परंतु, व्यवस्थापन आडमुठेपणाचे धोरण कायम ठेवत आहे. कामगार हित, कंपनीतील भविष्यातील दृष्टीकोनातून अत्यंत जाचक अटी संघटनेसमोर मांडत आहे. यावरुन व्यवस्थापन समेट घडविण्यासाठी उत्सुक नसल्याचे दिसते. त्यामुळे चिंचवड येथील एक्साइड इंडस्ट्रीज कंपनीतील कामगार ३० ऑक्टोबर पासून संपावर गेले आहेत. कंपनीतील बहुसंख्य कामगारांनी स्थापन केलेल्या कामगार संघटनेसोबत चर्चा न करणे, कर्मचारी मृत्यू फंडाची रक्कम कामगाराच्या पगारातून परस्पर कपात करणे, खोट्या तक्रारींच्या आधारे कामगारांविरोधात आरोप पत्र जारी करणे, निलंबित करणे, शिस्तभंगाची कारवाई, संघटनेच्या स्थानिक कार्यकारिणी सदस्यावर आकसबुद्धीने प्रशासकीय कारवाई, संघटनेच्या सदस्यत्वाचा राजीनामा घेऊन महाराष्ट्र लेबर युनियन किंवा अंतर्गत युनियनचा सभासद होण्यासाठी दबाव टाकणे, शिस्तभंगाच्या कारवाईची धमकी दिली जात आहे. कायम कामगारांनी स्थापन केलेल्या संघटनेत ढवळाढवळ करणे, कंपनी आवारात औद्योगिक शांततेस बाधा, इजा निर्माण करुन त्याचा आरोप कामगार संघटनेवर लावला जातो.

# नाशिकफाटा उड्डाणपुलाची देखभाल व दुरुस्ती तातडीने करा!

## राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलच्या वतीने निवेदन



**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** नाशिकफाटा येथील जमशेठजी टाटा उड्डाणपुलाची देखभाल व दुरुस्ती करण्यात यावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड शहर ओबीसी सेल यांच्यामार्फत आज अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देताना बाळासाहेब शिंदे वरिष्ठ उपाध्यक्ष संतोष माळी, भोसरी विधानसभा अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस चिंचवड विधानसभा अध्यक्ष विशाल क्षीरसागर, युवा नेते सुहास कुदळे, प्रतीक बगाडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. नाशिक फाटा येथील जमशेठजी टाटा उड्डाणपुलाच्या भिंतींवर नैसर्गिकरित्या वड, पिंपळ अशा झाडांचे मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. वेळोवेळी आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून सुद्धा त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचं पाऊल उचललं जातं नसल्यामुळे आज अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांना निवेदन देण्यात आले. सदर भिंतींवर मोठ्या प्रमाणात झाडांचे मुळे वाढत असलेले दिसून येत आहे. भविष्यात त्यामुळे पुलाला तडे जाण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. तरी आजचे निवेदन देऊन महानगरपालिकेला एक प्रकारे आंदोलनाच्या इशारा दिलेला आहे. लवकरात लवकर सदर कारवाई केली नाही तर येत्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामार्फत आंदोलन करण्यात येईल असा इशारा ओबीसी सेलचे शहराध्यक्ष विशाल जाधव यांनी दिला.

निवेदन दिल्यानंतर अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील म्हणाले एक जागरूक नागरिक म्हणून आपण सदर बाब निदर्शनास आणून दिल्याबद्दल आपले आभार. लवकरात लवकर संबंधित विभागाला पत्र व्यवहार करून येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये कारवाई करण्यात येईल.

# एस.बी. पाटील स्कूलच्या सार्थक जाधवची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड!

## ८०० मीटर धावण्याच्या स्पर्धेसाठी झाली निवड



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** रावेत येथील एस.बी. पाटील पब्लिक स्कूलच्या दहावी इयत्तेतील विद्यार्थी सार्थक जाधवची सीबीएसई राष्ट्रीय स्तरावरील १७ वर्षाखालील वयोगटात ८०० मीटर धावण्याच्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सीबीएसई क्लस्टर ९ या छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल बालेवाडी, पुणे येथे आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील धावपटू सहभागी झाले होते. यामध्ये पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचा सार्थक जाधव याने २००, ४०० मीटर सह ८०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवले आणि ६ नोव्हेंबर रोजी छत्तीसगड, रायपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. मुख्याध्यापिका डॉ. बिंदू सैनी क्रीडा शिक्षक धनाजी पाटील व गौरी उत्तरे यांचे मार्गदर्शन सार्थक ला मिळाले. पीसीईटीच्या उपाध्यक्षा पद्माताई भोसले यांनी जाधव याचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, सचिव विठ्ठल काळभोर,खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सार्थक जाधव चे अभिनंदन करून पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# वाहतूक विभागाकडून कारवाईचा दंडुका!

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड शहरात होणारी वाहतूककोंडी टाळण्यासाठी ठरावीक वेळेत शहरात जड अवजड वाहनांना बंदी करण्यात आली असताना आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर पोलिसांनी कारवाईचा दंडुका उगारला आहे. १६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत सहा हजार १७८ जड अवजड वाहनांवर कारवाई करत ६१ लाख ७१ हजारांचा दंड वसूल केला आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत चाकण, भोसरी, तळेगाव ही औद्योगिक क्षेत्रे, हिंजवडी, तळवडे, चिखली ही माहिती व तंत्रज्ञाननगरी (आयटी पार्क), तर देहू आणि आळंदी ही तीर्थक्षेत्रे आहेत. शहरातील सर्वांत मोठी बाजारपेठ पिंपरी येथे आहे. त्यामुळे या भागात मालाची ने-आण करणाऱ्या जड-अवजड वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या वाहनांमुळे दिवसेंदिवस वाहतूककोंडीत भर पडत आहे. तसेच अपघातांचीदेखील संख्या वाढत आहे. यासाठी पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेने सकाळी आठ ते अकरा आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊ या कालावधीत जड-अवजड वाहनांना शहरात प्रवेश बंदी केली आहे.

# उपक्रम, अभियान विनापरवानगी राबवल्यास कायदेशीर कारवाई!

## तीन दिवसांतील घटनांच्या पार्श्वभूमीवर निर्णय

पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।

विद्यार्थी संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेली हाणामारी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर लिहिल्याची तक्रार, राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यां कडून विद्यार्थ्यांना मारहाण अशा घटनांमुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात तणावाचे वातावरण आहे. मात्र, आता घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी विद्यापीठाने प्रशासनाने शैक्षणिक संकुलात सभासद नोंदणी, विविध अभियान, कार्यक्रम, उपक्रम, आंदोलनांना मज्जाव केला आहे. कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले. विद्यापीठाच्या पूर्व परवानगीशिवाय कार्यक्रम आयोजित करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. विद्यापीठात गेल्या तीन दिवसांपासून



सुरू असणाऱ्या अशैक्षणिक घटनांमुळे विद्यापीठाच्या संकुलाची तुलना दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाशी (जेएनयू) करण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांच्या घटनांचा फटका विद्यापीठाच्या प्रतिमेला बसत आहे. त्यामुळे विद्यापीठातील प्रशासकीय यंत्रणा आणि सुरक्षा व्यवस्था दक्ष झाली आहे. विद्यापीठामध्ये येणाऱ्या प्रत्येकाची चौकशी, नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. वसतिगृहात केवळ रहिवाशी विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलात सभासद नोंदणी, विविध अभियान, कार्यक्रम, उपक्रम, आंदोलन आदी उपक्रम घेण्यासाठी विद्यापीठ प्रशासन आणि पोलिसांची परवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. परवानगी न घेणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात लिहिलेल्या आक्षेपार्ह लिखाणाचा मी निषेध करतो. पण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना मारहाण करणार्यांवर कोणत्याही पक्षाचा किंवा संघटनेचा पदाधिकारी असो त्याच्यावर तीन दिवसात कारवाई झाली पाहिजे. जर तीन दिवसात कारवाई झाली नाही तर, विद्यापीठ बंद करणार अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मांडली. तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने असलेल्या हॉलची तोडफोड एप्रिल महिन्यात झाली होती. त्या तोडफोड करणाऱ्या विद्यार्थ्यांवर देखील अद्याप कारवाई झाली नाही. त्यामुळे आमच्या सर्व मागण्याची दखल विद्यापीठ प्रशासनाने घ्यावी अन्यथा तीव्र लढा उभारू असा इशारा त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रशासनाला त्यांनी दिला. या सर्व घडामोडी दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ठिकाणी येऊन ज्या डाव्या संघटनेतील पदाधिकाऱ्यांना काल मारहाण झाल्याची घटना घडली.

### आक्षेपार्ह लिखाणाचा निषेध

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वसतिगृहात आक्षेपार्ह मजकूर लिहिल्याची घटना दोन दिवसापूर्वी समोर आली.त्यानंतर राजकीय वर्तुळात आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळाले.त्या घटनेच्या निषेधार्थ भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या नेतृत्वाखाली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये काल आंदोलन करण्यात आले. त्यावेळी डाव्या संघटनेचे प्रतिनिधी आंदोलन ठिकाणी येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. त्यावेळी भाजपचे कार्यकर्ते आणि घोषणा देणार्यांमध्ये वादाचा प्रकार घडला. त्यामुळे काही विद्यापीठ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर भाजपचे पदाधिकारी आणि डाव्या संघटनेचे प्रतिनिधी यांच्यात पुन्हा एकदा आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळाले.

# दिवाळीच्या खरेदीमुळे शहरातील वाहतूक विस्कळीत

## पुणे मध्य भागासह उपनगरातील बाजारपेठेत गर्दी

पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।

दिवाळीच्या खरेदीसाठी शनिवारी लक्ष्मी रस्ता, मंडई परिसरात झुंबड उडाली. गर्दीमुळे बाजीराव रस्ता, शनिपार, मंडई, तसेच शिवाजी रस्ता परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली होती. खरेदीसाठी अनेकजण मोटारीतून आले होते. खरेदीसाठी गर्दी झाल्याने मध्य भागातील गल्ली-बोळातील वाहतूक विस्कळीत झाली होती. दिवाळीचा प्रारंभ गुरुवारी (रमा एकादशी आणि वसुबारस – ९ नोव्हेंबर) होत आहे. रविवारी (१२ नोव्हेंबर) नरक चतुर्दशी आणि लक्ष्मीपूजन आहे. नरक चतुर्दशीला नवीन कपडे परिधान करण्याची प्रथा असल्याने लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, टिळक रस्ता, फडके हौद



परिसरातील वस्त्र दालनात सकाळपासून खरेदीसाठी गर्दी झाली होती. मध्य भागातील सर्वच रस्त्यांवर खरेदीसाठी गर्दी झाली होती. बोहरी आळीतील रस्ते अरुंद असल्याने या भागातून चालणे देखील अवघड झाले होते. मंडई, शनिपार परिसरात उटणे, आकाशकंदील, पूजा साहित्य खरेदीसाठी गर्दी झाली होती. बुधवार पेठेतील पासोड्या मंदिराजवळील विद्युत साहित्य विक्री करणारी दुकाने रोषणाईने उजळली होती. अनेकजण सहकुटुंब मध्य भागात खरेदीसाठी आले होते. बाजीराव रस्ता, मंडई, शनिपार, शिवाजी रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. अनेकजण सहकुटुंब मोटारीतून खरेदीसाठी आले होते. नारायण पेठेतील वाहनतळावर मोटारी लावण्यास जागा उपलब्ध नसल्याने अनेकांनी नदीपात्रातील रस्त्यावर मोटारी लावल्या. नदीपात्रातील रस्त्यावर कोंडी झाली होती. नदीपात्रातील रस्त्यावर कोंडी झाल्याने केळकर रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली.

# १८४ ग्रामपंचायतींमधील १ हजार १३२ सदस्यांची आज होणार निवड!

## ८४९ सदस्यांची तसेच ४९ सरपंचांची बिनविरोध निवड

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** जानेवारी ते डिसेंबर या काळात मुदत संपणाऱ्या जिल्ह्यातील २३१ ग्रामपंचायती व १४२ ग्रामपंचायतींमधील रिक्त जागांच्यापोटनिवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला होता. मात्र, ८४९ सदस्यांची तसेच ४९ सरपंचांची बिनविरोध निवड झाली असून ३७ ग्रामपंचायती पूर्णपणे बिनविरोध झाल्या आहेत. त्यामुळे आता १८४ ग्रामपंचायतींमधील १ हजार १३२ सदस्यांची निवड रविवारी (दि. ५) होणाऱ्या मतदानानंतर निश्चित होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील जानेवारी ते डिसेंबर या काळात मुदत संपणाऱ्या २३१ ग्रामपंचायत व १४२ ग्रामपंचायतींमधील रिक्त झालेल्या जागांसाठी पोटनिवडणूक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार या ठिकाणी रविवारी मतदान होत आहे. निवडणूक प्रक्रियेनुसार २३१ ग्रामपंचायतींमधील २ हजार ४० सदस्य पदांसाठी निवडणूक होणार होती. माघारीच्या मुदतीनंतर एकच अर्ज आल्याने ८४९ सदस्यांची निवड बिनविरोध झाली आहे. त्यामुळे १८४ ग्रामपंचायतमधील १ हजार १३२ सदस्यांची निवड मतदारानंतर निश्चित होणार आहे. तर ५९ सदस्य पदांसाठी एकही अर्ज न आल्याने या जागा रिक्त राहणार आहेत. त्यात सर्वाधिक २४ जागा आंबेगाव तालुक्यात आहेत, भोर तालुक्यात १७ तर मुळशी तालुक्यातील ९ सदस्यपदे रिक्त राहतील. जिल्ह्यात ३७ ग्रामपंचायती पूर्णपणे




बिनविरोध झाल्या आहेत. सर्वाधिक १२ ग्रामपंचायती भोर तालुक्यातील असून मावळमधील ४ ग्रामपंचायती बिनविरोध झाल्या आहेत. मुळशी, आंबेगाव व पुरंदरमध्ये प्रत्येकी ३ ग्रामपंचायती बिनविरोध झाल्या आहेत. सरपंच तसेच सदस्यपदासाठी एकच अर्ज आल्याने जिल्ह्यातील दहा ग्रामपंचायती पूर्णपणे बिनविरोध झाल्या आहेत. त्यात मुळशी, जुन्नर व भोर तालुक्यातील प्रत्येकी २, मावळ १ व आंबेगाव तालुक्यातील ३ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. मुळशी, वेल्हे व भोर तालुक्यातील प्रत्येकी एका ग्रामपंचायतीमधील सरपंचपदासाठी एकही अर्ज न आल्याने येथील सरपंचपद रिक्त राहणार आहे. तर ४९ ठिकाणी सरपंचपद बिनविरोध झाले आहे. भोर तालुक्यातील सर्वाधिक १३ ठिकाणी सरपंचपद बिनविरोध झाले आहे. आंबेगाव तालुक्यात ९, खेड तालुक्यात ८, जुन्नर तालुक्यात ६, मुळशीत ४, दौंड व बारामतीत प्रत्येकी १ व पुरंदरमध्ये तीन ग्रामपंचायतींमध्ये सरपंचपद बिनविरोध झाले आहे. त्यामुळे १७९ ग्रामपंचायतींमध्ये सरपंचपदासाठी रविवारी मतदान होणार आहे.

### पोटनिवडणुकीत २०४ पैकी १०६ पुन्हा रिक्त

» निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानुसार १४२ ग्रामपंचायतीमधील २०४ रिक्त जागांसाठी निवडणूक होणार होती. मात्र, १०६ ठिकाणी एकही अर्ज आला नसल्याने ही पदे पुन्हा रिक्त राहणार आहेत. तर ६३ सदस्यपदे बिनविरोध झाली आहेत. त्यामुळे २९ ग्रामपंचायतीमधील ३५ सदस्यपदांसाठी रविवारी मतदान होणार आहे. या ग्रामपंचायतीमधील ७ ठिकाणी सरपंचपदे रिक्त होती. त्यापैकी तीन ठिकाणी एकही अर्ज आला नसल्याने ही पदे रिक्त राहतील, तर दोन ठिकाणी एकच अर्ज आल्याने बिनविरोध निवड करण्यात आली आहे. दोन ठिकाणी सरपंचपदासाठी प्रत्यक्ष निवडणूक होणार आहे.

# ६६ वी वरिष्ठ राज्य अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा!

## ७ नोव्हेंबरपासून, विजेत्यांना मिळणार महिंद्रा थार, ट्रॅक्टर

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** भारतीय कुस्ती महासंघ आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने ६६ वी वरिष्ठ राज्य अजिंक्यपद, महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा ७ ते १० नोव्हेंबर २०२३ दरम्यान फुलगाव येथील नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळेत पार पडणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र केसरी होणाऱ्या विजेत्या कुस्तीगीरला महिंद्रा थार तसेच उपमहाराष्ट्र केसरी कुस्तीगीराला ट्रॅक्टर असे बक्षीस दिले जाणार आहे, अशी माहिती स्पर्धेचे स्वागताध्यक्ष पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे सदस्य प्रदीप कंद यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे, सरचिटणीस योगेश दोडके आणि विलास कथुरे उपस्थित होते. स्पर्धेचे स्वागताध्यक्ष प्रदीप कंद म्हणाले की, महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे उद्घाटन ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील,




भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष खासदार रामदास तडस आणि उपाध्यक्ष मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीमध्ये होणार. तर स्पर्धेच बक्षीस वितरण १० नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या हस्ते होणार. सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळेमध्ये साधारण ५० हजार प्रेक्षक क्षमता असलेले स्टेडीयम उभारण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. प्रदीप कंद पुढे म्हणाले की, या स्पर्धेत ३६ जिल्हा आणि ६ महानगरपालिका असे एकूण ४२ संघ सहभागी होत आहेत. एका कुस्ती संघात गादी विभागातील १० आणि माती विभागातील १० असे एकूण २० कुस्तीगीर २ कुस्ती मार्गदर्शक आणि १ संघ व्यवस्थापक असे एकूण २३ जणांचा सहभाग असणार आहे. तसेच या कुस्ती स्पर्धेत ८४० कुस्तीगीर ८४ कुस्ती मार्गदर्शक आणि ४२ व्यवस्थापक, ८० पंच आणि ५० पदाधिकारी असे एकूण ११०० जणांचा सहभाग असणार, असे त्यांनी सांगितले.